# 2. विश्वासणाऱ्यांचे आत्मचरीत्र

सुमंतराव साठे पुण्याचे राहणारे होते. तरूणपणी त्यांचा सपर्क इंग्रज लोकांसोबत आला होता. ते इंग्रज लोकांसोबत राहायचे आणि त्यांच्यासोबत शिकार करायला जायचे. इंग्रजांच्या संपर्कात राहून त्यांना येशू ख्रिस्ताची ओळख झाली. देव सर्वांवर प्रेम करतो आणि कोणाही सोबत भेदभाव करत नाही हे त्यांना समजून आले. त्यांना समजले कि देव सर्वांवर आणि विशेष करून गरीबांवर प्रेम करतो म्हणून त्यांनी बाप्तीस्मा घेतला आणि ख्रिस्ती लोकांच्या संगतीमध्ये राहू लागले. परंतू घरच्यांचा विरोध होऊ लागला होता. घरच्यांचा विरोध खूप अधीक वाढल्यामुळे त्यांना नातेवाईक आणि ख्रिस्ती लोक हयांच्यामध्ये निवड करावी लागली होती आणि त्यांना ख्रिस्ती लोकांमध्ये राहण्याचे निवडले. नोकरीसाठी नागपूरला आले असतांना त्यांना शासकीय नोकरीची संधी मिळाली. नागपूर येथील सेंट थॉमस चर्च, न्यू कॉलनी या चर्चचे ते सक्रीय सभासद होते. त्यांचा विवाह चंद्रपूर येथील शकुंतला पवार हयांच्यासोबत झाला होता. ते नागपूरच्या बेझनबाग भागामध्ये राहू लागले होते. तेथेच त्यांची ओळख श्री विक्रम कांबळे हयांच्यासोबत झाली आणि त्यांची ओळख कालांतराने नात्यामध्ये रूपांतरीत झाली. श्री सुमंतराव साठे यांचे चिरंजीव श्री अरूण साठे याचा विवाह श्री विक्रम कांबळे हयांची कन्या मधूलीका कांबळे हयांच्यासोबत झाला.

श्रीमती मधूलीका साठे यांनी सांगितले की लहानपणी त्यांना इतर समाजाचे लोक चिडवायचे, किरस्तानाचे पोरं म्हणून चिडवायचे. त्यांची गंमत करायचे व त्यांचा अपमानसुध्दा करायचे. परंतू लोकांच्या निंदेला न घाबरता विश्वासामध्ये त्या टिकून राहील्या. हीच गोष्ट प्रभू येशूने शिष्यांना सांगितली होती. येशू त्यांना म्हणाला होता कि नीतिमत्वाकरिता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य. कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा व छळ करितील आणि तुमच्याविरूध्द सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य. आनंद व उल्हास करा. कारण स्वर्गात तुमचे मोठे प्रतिफळ आहे. कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला. येशूने सुवार्ताप्रचारासाठी शिष्यांना पाठविले तेव्हा त्यांना सांगितले, पाहा, लांडग्यामध्ये मेंढरांना पाठवावे तसे मी तुम्हाला पाठवितो. म्हणून तुम्ही सापासारखे चतुर व कबुतराप्रमाणे निरूपद्रवी व्हा. माणसांच्या बाबतीत जपून राहा. कारण ते तुम्हाला न्यायसभांच्या स्वाधीन करतील. आपल्या न्यायसभास्थानांत तुम्हाला फटके मारतील आणि तुम्हाला माझ्यामुळे देशाधिकारी व राजे हयांच्यापुढे नेण्यात येईल. परंतू तुम्ही त्यांना आणि परराष्ट्रीयांना साक्ष व्हाल. त्यांना घाबरू नका. तर देवाला भिऊन वागा. जे धर्मपुढारी होते त्यांनी नेहमीच येशूला विरोध केला होता. कारण येशू ख्रिस्त लोकांना आणि विशेषकरून बंधनामध्ये राहणाऱ्यांना मुक्तीची सुवार्ता सांगत होता आणि लोकांना पापक्षमेची घोषणा करत होता. आजही येशूवर विश्वास करणाऱ्यांचा छळ केला जातो. स्थापीत धर्मव्यवस्थेचे लोक दुर्बळजणांना बंधनामधून अडकवून ठेवतात, त्यांचे शोषण करतात आणि त्यांच्या मुक्तीचा विरोध करतात. गरीबांचा आणि दुर्बळांचा विकास व उध्दार झालेला त्यांना आवडत नाही म्हणून विश्वासणाऱ्यांची थट्टा करतात, निंदा करतात.



# देवाचे प्रगटीकरण

पिता, पुत्र व पवित्र आत्मा या रूपाने देवाने स्वतःला प्रगट केल्याचे पवित्रशास्त्रामधून दिसून येते. देवाला कधी कोणी पाहिले नाही. परंतू देव वेगवेगळया रूपाने मनुष्याला प्रगट होत असतो. देव मोशेला जळत्या झुळपामधून प्रगट झाला होता आणि बोलला होता. देवाने मिसर देशात राहणाऱ्या आणि फारोच्या गुलामीमुळे शोषीत इस्राएली लोकांची विपत्ती पाहिली, त्यांचा आक्रोश ऐकला आणि त्यांचे दुःख जाणून घेतले आणि त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मोशेची निवड केली होती. देवाने मोशेला मिसर देशात जाण्याचे सांगितले परंतू मोशे मिसर देशात जाण्याचे टाळत होता कारण तो मिसरचा राजा फारो हयाच्यापासून पळून आला होता. मिसर देशात पुन्हा जाण्यासाठी आणि मोशेच्या मनातून फारोची भीती काढण्यासाठी देवाने मोशेला अग्नीरूपाने दर्शन दिले होते. त्याव्दारे देवाने मोशेला बळ दिले. देव मोशेसोबत बोलतांना म्हणाला, मी परमेश्वर आहे. फारोने जर माझे नाव विचारले तर त्याला 'मी आहे तो आहे' या नावाच्या देवाने पाठविले आहे असे सांग.

'मी आहे' हया नावाने देवाने स्वतःला मोशेला प्रगट केले. देव स्वतःला मनुष्यासमोर प्रगट करतो हयाचे अनेक कारणं आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे देवाने मनुष्याला आपल्या प्रतिरूपाचे निर्माण केले आहे. मनुष्याला स्त्री व पुरूष असे निर्माण केले आहे. देवाने मनुष्याला आशिर्वाद दिला, देव मनुष्याला म्हणाला, फलद्रूप व्हा, बहुगूणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका. तेव्हापासून मनुष्याची वाढ होऊ लागली. परंतू त्यांच्यामध्ये वाईटसुध्दा वाढू लागले होते आणि मनुष्य वाईटाची निवड करू लागला. आदामाने हव्वेला दोषी ठरविले आणी हव्वेने सापाला दोषी ठरविले. त्यांचा मुलगा काईन हयाने आपल्या भावाची हत्या केली. नोहाच्या काळामध्ये लोकांचे विचार दुष्ट होते, ते वाईट करू लागले होते. बाबेलजवळ राहणाऱ्या लोकांनी उंच मनोरा बांधण्याचा प्रयत्न केला. तेव्हा देवाने हस्तक्षेप केला व त्यांच्या भाषेचा गोंधळ केला व त्यांना वाईट करण्यापासून थांबवले. देवाने मिसर देशात असलेल्या इस्राएली लोकांची विपत्ती पाहिली आणि त्यांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी मोशेला प्रगट केले आणि निवडले होते.

मनुष्याला बंधनातून सोडविण्यासाठी, त्यांना मुक्त करण्यासाठी देव स्वतःला प्रगट करत असतो. देव मोशेला म्हणाला, मी अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांना सर्वसमर्थ देव म्हणून प्रगट झालो होतो. सर्वसमर्थ देव म्हणजे 'एल शाद्दाय'. देव अब्राहामासोबत बोलला. देव अब्राहामाला म्हणाला, तू आपला देश, आपले नातेवाईक आणि आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवील त्या देशात जा. तेथे मी तुझे एक मोठे राष्ट्र करीन, तुझे नाव मोठे करीन, तुला आशिर्वाद देईन आणि तुझ्याव्दारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशिर्वादीत होतील. देवाने सांगितल्याप्रमाणे अब्राहाम आपला देश, आपले नातेवाईक आणि आपल्या बापाचे घर सोडून कनान देशात वेगवेगळया ठिकाणी जाऊन राहीला. देवाने त्याच्याव्दारे पृथ्वीवरील लोकांना आशिर्वाद दिला. आजही यहूदी, मुस्लीम आणि ख्रिस्ती या धर्माचे लोक अब्राहामाला

आपला मुळपिता मानतात. अब्राहामाने देवाचे सामर्थ्य पाहिले. देव इसहाकासोबत होता. त्याला विहीर तयार करण्याची कला होती. त्याने देवाच्या सामर्थ्याचा अनुभव घेतला होता. याकोबानेही देवाच्या सामर्थ्याचा अनुभव घेतला होता आणि म्हणून अब्राहाम, इसहाक आणि याकोब देवाला सर्वसमर्थ देव या नावाने ओळखू लागले होते. देव त्यांना सामर्थ्याच्या रूपाने प्रगट झाला होता. या व्यतिरीक्त देवाला अनेक नावाने ओळखले जाते आणि देव स्वतःला वेगवेगळया रूपाने व नावाने प्रगट होत असतो. इब्री या पुस्तकाचा लेखक म्हणतो, देव प्राचीन काळी अशांअशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्टयांच्या व्दारे आपल्या (यहूद्यांच्या) पूर्वजांसोबत बोलला. तो हया काळाच्या शेवटी पुत्राच्या व्दारे बोलला आहे. पुत्राव्दारे म्हणजे येशू ख्रिस्ताव्दारे. येशू ख्रिस्ताला देवाचा पुत्र म्हटले जाते. येशूने सांगितले, ज्यांनी मला पाहिले त्यांनी देवाला पाहिले. देव आणि मी एक आहे. मी अब्राहामाच्या आधीपासून आहे. येशूने शिष्यांना सांगितले, तुमचे अंतकरण अस्वस्थ होऊ नये, देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा. मी पित्याला विनंती करीन मग तो तुम्हाला कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल अशासाठी कि त्याने तुम्हाबरोबर सर्वदा राहावे. ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व काही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हाला आठवण करून देईल.

देवाचे प्रगटीकरण अमर्यादीत आहे. देव स्वतःला वेगवेगळया रूपाने, नावाने प्रगट करत असतो. देवाने स्वतःला पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा असे प्रगट केले आहे. कोणालाही देवाचे पूर्ण प्रगटीकरण होऊ शकत नाही. देवे मोशेला म्हणाला, मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांना सर्वसमर्थ देव असा प्रगट झालो होतो. परंतू 'परमेश्वर' या नावाने प्रगट झालो नव्हतो. देवाला परमेश्वर या नावानेही ओळखले जाते. परमेश्वर म्हणजे याव्हे. याव्हे या नावाचे वेगवेगळे अर्थ सांगितले जाते आणि वेगवेगळया अर्थांपैकी एक अर्थ म्हणजे लेट गो, जाऊ दे, सोडून दे, मोकळे कर, मुक्त कर, इत्यादी. मुक्ती हा देवाच्या नावाचा अर्थ आहे आणि मुक्ती हा देवाचा स्वभाव गुणधर्म होय. देवाने स्वतःला येशूच्या रूपाने प्रगट केले. येशू या नावाचा अर्थ म्हणजे तारण किंवा तारणारा. देव तारणारा, बंधनातून सोडविणारा आहे म्हणून देवाने इस्राएली लोकांची विपत्ती पाहिली, त्यांचा आक्रोश ऐकला आणि त्यांचे दुःख जाणून घेतले आणि त्यांना फारोच्या गुलामीतून सोडविण्यासाठी मोशेला मिसर देशात पाठविले. देव मोशेला म्हणाला, इस्राएली लोकांना सांग, तुम्हास मिसऱ्यांच्या ओझ्याखालून सोडविणारा मी तुमचा देव परमेश्वर आहे. देवाने इस्राएली लोकांप्रमाणेच भारतातील लोकांना जातीव्यवस्थेच्या गुलामीतून आणि अस्पृश्यतेच्या बंधनातून सोडविले. जे लोक नव्हते त्यांना देवाने स्वतःचे लोक होण्याचा सन्मान दिला. येशू ख्रिस्ताने लोकांना पापांची क्षमा दिली. भारतामध्ये अस्पृश्य जातीच्या लोकांना सांगितले जाते कि तुम्ही मागच्या जन्मी पाप केले होते म्हणून तुमचा अस्पृश्य जातीमध्ये जन्म झालेला आहे आणि मरेपर्यंत त्यामधून सुटका नाही किंवा बदल नाही. परंतू येशू ख्रिस्तामध्ये पापांची क्षमा आहे, बदल आहे. मनुष्याला नवीन जीवन जगण्याची संधी आहे. देवाने पवित्र आत्मा आपल्याला दिला आहे. देवाचा पवित्र आत्मा आपल्याला ज्ञान व बुध्दी देतो, आपले मार्गदर्शन करतो. अशाप्रकारे मनुष्याच्या उध्दारासाठी देवाने स्वतःला पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा या रूपाने प्रगट केले आहे.



# 1. विश्वासणाऱ्यांचे आत्मचरीत्र

1870 च्या काळामध्ये काही मिशनरी चंद्रपूर, यवतमाळ जिल्हयामध्ये सुवार्ताप्रचाराचे कार्य करू लागले होते. अनेकांनी सुवार्ता ऐकली आणि देवावर विश्वास करू लागले. त्यांच्यामध्ये ख्रिस्तवासी तातोबा कांबळे एक होते. त्यांचे चिरंजीव श्री विक्रम कांबळे हयांचा जन्म (अंदाचे) 1924 मध्ये यवतमाळ जिल्हाच्या पूसद येथे झाला होता. त्यांचे शिक्षण पूसद येथील शासकीय शाळेमध्ये झाले होते. लहानपणापासून त्यांना तंत्रज्ञानाची आवड होती आणि तेव्हा टाईप रायटरचा वापर प्रत्येक क्षेत्रामध्ये करण्यात येत होता त्यामुळे त्यांनी काळाची गरज पाहून व उत्पन्नाचे योग्य साधन म्हणून टाईप रायटर मेकॅनीकचे प्रशिक्षण घेतले आणि टाईप रायटर मेकॅनीकचे काम करू लागले होते. त्यासाठी त्यांनी नागपूरसारख्या मोठया शहराची निवड केली होती. त्यांना चांगले उत्पन्न मिळू लागले होते व त्यांची आर्थिक स्थिती चांगली झाली होती. नागपूर येथील बेझनबाग भागामध्ये ते आपल्या परिवारासोबत राहू लागले होते आणि व्ही.सी.ए. क्रिकेट स्टेडीयमजवळ स्थित एपिस्कोपल मेथॉडीस्ट चर्चचे ते सभासद होते. ते फार कष्टाळू आणि देवभीरू होते. त्यांचे जीवन प्रार्थनामय होते. घरामध्येसुध्दा त्यांनी लेकरांना चर्च आणि प्रार्थनेचे महत्व शिकविले होते.

त्यांचा विवाह जालना जवळच्या सिंदखेडराजा या गावातील शांताबाई निकाळजे हयांच्यासोबत झाला होता. श्रीमती शांताबाई हयांची आई श्रीमती लक्ष्मीबाई यंगड बुलाढाणा या जिल्हयातील चिखलीच्या राहणाऱ्या होत्या. नागपूरमध्ये स्थायीक झाल्यानंतर विक्रम कांबळे इतर शहरांमध्येसुध्दा जाऊन टाईप रायटर मेकॅनीकचे काम करायचे. एकदा जगदलपूरहून त्यांना टायपिंग रिपेअरींगसाठी बोलावणे आले होते. नागपूर ते रायपूरपर्यंत एक ट्रेन होती आणि जगदलपूरसाठी दूसऱ्या ट्रेनने प्रवास करावा लागत होता. ट्रेनपेक्षा ट्रकने जाने सोपे होईल हया विचाराने त्यांनी सिमेंटच्या ट्रकने जगदलपूरला जाण्याचे ठरविले. रायपूर महामार्गावर त्यांना जगदलपूरला जाणारी एक ट्रक मिळाली व त्यामध्ये बसून ते प्रवास करू लागले. डोंगराळ भागातून जात असतांना नागवळणी रस्त्याने जावे लागत होते. दुर्दैवाने नागवळणी रस्त्याने जात असतांनाच ट्रक उलटली आणि त्यामध्ये त्यांचा गंभीर अपघात झाला. त्यांना जगदलपूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातामध्ये त्यांचा कबंरेपासून खालपर्यंतचा भाग निकामी झाला व ते बेशुध्द झाले. जगदलपूर येथील डॉक्टरांना त्यांच्याजवळ काही कागदपत्र मिळाले होते व त्यावरून ते नागपूरचे रहिवाशी आहेत असे त्यांच्या निदर्शनास आहे. त्यांनी नागपूर येथील त्यांच्या नातेवाईकांना ही बातमी सांगितली. श्रीमती शांताबाई आपल्या आईला घेऊन जगलदपूरला गेल्या व आपल्या पतीला घेऊन आल्या. त्यांचा पुढील उपचार नागपरू येथील मेयो इस्पीतळात होऊ लागला होता.

तब्बेतीमध्ये थोडी सुधारणा होऊ लागल्यामुळे त्यांना घरी आणले. देवाची कृपा त्यांच्यावर होती. काही दिवसांनी ते पूर्ण बरे झाले आणि नागपूरमध्येच राहून काम करू लागले होते.